# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः14.06.2026** **वारःरविवार**

---

1. भारतीय लष्करानं भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज राहावं-राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं आवाहन
2. फ्रान्स आणि स्लोव्हाकिया या दोन देशांच्या दौऱ्यात पंतप्रधान मोदी G सात परिषदेतही सहभागी होणार
3. भारतीय वायु दलाच्या 'एएन-थर्टी टू' विमानाच्या अपघातात 5 जवानांना वीरमरण आणि
4. महिलांच्या T20 विश्वचषकात भारताची आज पाकिस्तानशी लढत

**<u>राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू</u>**

भारतीय लष्करानं बदलत्या सुरक्षा आव्हानांशी आणि तांत्रिक प्रगतीशी जुळवून घेत भविष्यासाठी सज्ज राहण्याची गरज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केली. डेहराडून इथल्या आयएमए अर्थात इंडियन मिलिटरी अकादमीमध्ये 158 व्या नियमित आणि 141 व्या तांत्रिक अभ्यासक्रमाच्या दीक्षांत संचलन सोहळ्यामध्ये त्या बोलत होत्या. अधिकारी प्रशिक्षणार्थींनी आयुष्यभर शिकण्याची वृत्ती, नैतिक मूल्यं आणि धैर्यपूर्ण नेतृत्व जोपासावं, असं आवाहन त्यांनी केलं. देशाचे सार्वभौमत्व आणि अखंडतेचे रक्षक म्हणून जबाबदारी पार पाडण्याचा सल्लाही त्यांनी दिला. संचलनामध्ये नऊ महिला प्रशिक्षणार्थींचा समावेश हा आयएमएच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा असल्याचं सांगत त्यांनी सर्व नवोदित अधिकारी आणि मित्र राष्ट्राच्या प्रशिक्षणार्थींचंही अभिनंदन केलं.

**<u>मोदी दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्स आणि स्लोव्हाकिया या दोन देशांच्या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात फ्रान्समधील 'नीस' शहरात काल दाखल झाले. या दौऱ्यादरम्यान, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांच्याशी चर्चा, 'भारत इनोव्हेट्स' उपक्रमाचा संयुक्तपणे शुभारंभ, महत्त्वाच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर विचारविनिमय तसंच G सात शिखर परिषदेत सहभाग असा पंतप्रधानांचा कार्यक्रम असेल. नीस शहरात भारतीय समुदायानं पंतप्रधानांचं अत्यंत उत्साहानं स्वागत केल्याबद्दल मोदी यांनी समाज माध्यमावरील एका पोस्टद्वारे त्यांचे आभार मानले.
दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्लोव्हाकिया भेटीमुळं दोन्ही देशांमधील सहकार्याच्या नवीन संधी उपलब्ध होतील आणि आर्थिक संबंध अधिक दृढ होण्यास मदत होईल, असं स्लोव्हाकियातील भारताच्या राजदूत अपूर्वा श्रीवास्तव यांनी ब्रातिस्लावा इथं आकाशवाणीच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितलं.

**<u>सेठ निवड</u>**

सरकारने लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांची 30 जूनपासून नवे भूदल प्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. सध्या ते व्हाइस चीफ ऑफ आर्मी स्टाफ म्हणून कार्यरत आहेत. विद्यमान भूदल प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी 30 जून रोजी निवृत्त होत आहेत. राष्ट्रीय संरक्षण अकादमीचे माजी विद्यार्थी असलेले धीरज सेठ यांची 1986 मध्ये आर्मर्ड कोरमध्ये नियुक्ती झाली होती. जवळपास चार दशकांच्या कारकिर्दीत त्यांनी विविध महत्त्वाच्या कमांड आणि धोरणात्मक पदांवर काम केले आहे. साउथ वेस्टर्न कमांड आणि सदर्न कमांडचे नेतृत्व करण्याचाही त्यांना मान मिळाला आहे.

**<u>चाचणी</u>**

'डीआरडीओ' अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं लांब पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांविरुद्ध बहु-स्तरीय संरक्षण आणि मध्यम पल्ल्यावरील जहाजांना लक्ष्य करणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या तीन यशस्वी चाचण्या घेतल्या. त्याबद्दल संरक्षण

मंत्री राजनाथ सिंह यांनी डीआरडीओचं अभिनंदन केलं आहे. या चाचण्यांमुळं आक्रमक आणि प्रतिरोधक अशी क्षेपणास्त्र बाळगणाऱ्या निवडक देशांमधे आता भारताची गणना होते असं सिंह यांनी समाज माध्यमांवर म्हटलं आहे. नौदलाच्या मध्यम पल्ल्याच्या जहाज-विरोधी क्षेपणास्त्रांनीही आपली क्षमता सिद्ध केली आहे, असंही त्यांनी सांगितलं. या चाचण्यांद्वारे लांब आणि मध्यम पल्ल्याची क्षेपणास्त्र हवेतच नष्ट करण्याची क्षमता सिद्ध झाली आहे.

**<u>त्रिभाषा</u>**

केंद्रीय विद्यालय संघटन म्हणजेच केव्हीएसनं शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून इयत्ता सहावी आणि नववीच्या वर्गांसाठी त्रि-भाषा सूत्राअंतर्गत प्रत्येक शाळेत किमान एका तुकडीसाठी संस्कृत भाषा अनिवार्य केली आहे. बदली पात्र केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या मुलांची शैक्षणिक गैरसोय टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. नव्या नियमानुसार विद्यार्थ्यांनी निवडलेल्या तिसऱ्या भाषेच्या आधारे त्यांची वर्गवारी केली जाईल.

दरम्यान, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ म्हणजेच सीबीएसईनंही राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 ला अनुसरून इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी तीन भाषांचा अभ्यास सक्तीचा केला आहे. यात किमान दोन भारतीय भाषा असणं अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांवरचा परीक्षेचा ताण कमी करण्यासाठी इयत्ता दहावीच्या पातळीवर या तिसऱ्या भाषेसाठी कोणतीही मंडळ परीक्षा घेतली जाणार नसल्याचं सीबीएसईनं स्पष्ट केलं.

**<u>ISRO-LUNAR</u>**

चंद्रावरील अत्यंत थंड वातावरणाचा सामना करू शकणारी प्रगत कृत्रिम उष्णता प्रणाली विकसित करण्यासाठी इस्रो आणि अणुऊर्जा विभागाने संयुक्तपणे काम सुरू केले आहे. बंगळुरू इथं झालेल्या एका परिषदेत इस्रोचे अध्यक्ष डॉ. व्ही. नारायणन यांनी ही माहिती दिली. चांद्रयान-3 मोहिमेतील विक्रम लँडर सौरऊर्जेवर आधारित असल्याने तो चंद्रावर केवळ 14 दिवस कार्यरत राहू शकला होता. आता नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने 200 दिवसांपर्यंत कार्यक्षम राहणारा लँडर विकसित करण्याचे उद्दिष्ट आहे. कृत्रिम उष्णता प्रणालीमुळे चंद्रावरील उणे 129 अंश ते 121 अंश सेल्सिअस तापमानातील तीव्र बदलांचा सामना करणे शक्य होणार आहे. तसेच इस्रो आणि सीएसआयआरने तांत्रिक सहकार्यासाठी 40 क्षेत्रे निश्चित केली असून त्यापैकी 17 प्रकल्पांच्या अंमलबजावणीला मंजुरी देण्यात आली आहे.

**<u>इराण-अमेरिका</u>**

इराणसोबतचे युद्ध संपवण्यासाठी आज एक करार केला जाईल आणि त्यानंतर लगेचच मोक्याच्या ठिकाणी असलेल्या 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ' मधून वाहतूक सर्वांसाठी खुली केली जाईल, असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील एका पोस्टद्वारे म्हंटलं आहे. त्याच वेळी, हा करार अपेक्षेप्रमाणे झाला नाही, तर नवीन हल्ले करण्याचा इशाराही त्यांनी कायम ठेवला. इराणचा अणुकार्यक्रम प्रभावीपणे निष्प्रभ करण्यात आला असून नंतरच्या टप्प्यावर उर्वरित अणुसाठ्याची विल्हेवाट लावली जाईल, असं ट्रम्प यांनी म्हंटलं आहे.

दरम्यान, कोणताही करार त्वरित होण्याची शक्यता नसल्याचं इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई यांनी म्हंटलं आहे. कदाचित आगामी दिवसांत करार होऊ शकेल, अशी पुस्तीही त्यांनी जोडली. इराणच्या सरकारी वृत्त संस्थेच्या माहितीनुसार, समोरील बाजूकडून दिसून येणाऱ्या विसंगतींमुळं या प्रक्रियेबाबत सावधगिरी बाळगण्याचं आवाहन बघाई यांनी केलं आहे.

**<u>योग-दिन</u>**

आंतरराष्ट्रीय योग दिन 2026 च्या पूर्वतयारीचा एक भाग म्हणून, आयुष मंत्रालयानं 'मोरारजी देसाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ योग' आणि हबिल्ड यांच्या सहकार्यानं आज एका महत्त्वपूर्ण जागतिक ऑनलाइन योग कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. सकाळी सव्वा 6 ते 7 वाजून 35 मिनिटे या वेळेत झालेल्या या ऑनलाइन योग कार्यक्रमात 130 हून अधिक देशांतील लोकांचा सहभाग होता. आयुष मंत्री प्रतापराव जाधव हे देखील या उपक्रमात सहभागी झाले होते.

**<u>जागतिक-रक्तदाता दिन</u>**

आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी 'जागतिक रक्तदाता दिना'निमित्त देशभरातील नागरिकांना स्वेच्छेनं रक्तदान करण्याचं आवाहन केलं आहे. रक्तदान केलेल्या रक्ताच्या प्रत्येक थेंबात गरजू व्यक्तीला नवजीवन देण्याची आणि एखाद्या कुटुंबाच्या आयुष्यात पुन्हा आनंद आणण्याची ताकद असते, असं समाज मध्यमावरील एका पोस्टमध्ये जाधव यांनी म्हटलं आहे.

**अमित शाह**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसंख्याशास्त्रीय बदलांवरील समितीला सीमावर्ती जिल्ह्यांतील लोकसंख्या रचनेतील बदलांचा अभ्यास करण्याचे निर्देश दिले आहेत. ते काल या समितीच्या बैठकीत बोलत होते.

अवैध स्थलांतर आणि इतर कारणांमुळं होणाऱ्या बदलांची पाहणी करण्यासाठी सीमावर्ती भाग, महानगरं तसंच औद्योगिक शहरांना भेट देण्यासही गृहमंत्र्यांनी सांगितलं.

**एएन-32-अपघात**

आसाममधील जोरहाट इथं काल सकाळी झालेल्या 'एएन-थर्टी टू' विमान अपघातात पाच जवानांना प्राण गमवावे लागल्याबद्दल भारतीय वायु दलानं शोक व्यक्त केला आहे. समाज माध्यमावरील एका पोस्टद्वारे माहिती वायु दलानं दिलेल्या माहितीनुसार, या दुर्घटनेत स्क्वॉड्रन लीडर प्रशांत सिंग, फ्लाईट लेफ्टनंट शुभम कुमार, सार्जंट जितेंद्र शर्मा, अग्निवीर-वायू खेमाराम कुमावत आणि अग्निवीर-वायू दानिश आलम यांना वीरमरण आलं आहे. या कठीण प्रसंगी या जवानांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभं असल्याचं हवाई दलानं म्हटलं आहे.

तत्पूर्वी, नियमित उड्डाणाच्या वेळी भारतीय वायु दलाच्या 'एएन-32' विमानाचा काल सकाळी लँडींग दरम्यान अपघात झाला. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या अपघाताबद्दल दुःख व्यक्त करून मृत जवानांच्या कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त केली आहे.

**क्रिकेट**

इंग्लंड आणि वेल्समध्ये सुरू असलेल्या आयसीसी महिला टी-20 विश्वचषक स्पर्धेत, भारतीय संघ आज बर्मिंगहॅममधील एजबॅस्टन इथं आपला पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध सामन्यानं आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. हा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी 7 वाजता सुरू होईल. दोन्ही संघांमधील यापूर्वीच्या 16 सामन्यांपैकी 13 सामन्यांत भारतानं विजय मिळवला आहे.

अन्य सामन्यात, स्पर्धेत पदार्पण करणारा नेदरलँड्स आणि बांगलादेश यांच्यात लढत होईल. हा सामना भारतीय वेळेनुसार सकाळी साडे 10 वाजता सुरू होईल.

दरम्यान, वेस्ट इंडिजनं काल गतविजेत्या न्यूझीलंडचा 7 गडी राखून पराभव केला. तर, ऑस्ट्रेलियानं दक्षिण आफ्रिकेचा 65 धावांनी पराभव करून आपल्या टी-20 विश्वचषक मोहिमेची सुरुवात केली.

स्पर्धेतील अंतिम सामना पुढील महिन्याच्या 5 तारखेला लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.